केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) (पुर्वीची इंदिरा आवास योजना ) करिता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनाकडून प्राप्त दुसरा हप्ता सन २०१७-१८मधील अर्थसंकल्पिय निधीतून वितरणास व खर्च करण्यास मान्यता देणेबाबत. (लेखाशिर्ष २५०५ २९९२.)

**महाराष्ट्र शासन**

**आदिवासी विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ / प्र. क्र.२३ / कार्यासन.६**

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

तारीख: - २२ जानेवारी, २०१८.

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक ,क्रमांकः अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक, क्रमांकः अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
३) वि. वि, शासन परिपत्रक, क्रमांकः अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७.
४) केंद्र शासन,ग्राम विकास मंत्रालयाचे पत्र क्र.J-१२०२५/०१/२०१६-RH(A/C)-२/B-Maharashtra, दि.०८ जानेवारी, २०१८.
५) ग्राम विकास व जलसंधारण विभागाची नस्ती क्र.प्रआयो- २०१७ / प्र.क्र.१५७ /यो-१०.
६) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय समक्रमांक दि. ०४ सप्टेंबर, २०१७.

**शासन निर्णय:-**

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) (पुर्वीची इंदिरा आवास योजना ) करिता आदिवासी उपयोजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र हिस्स्याकरीता मागणी क्र.टी-५, २५०५-ग्रामीण रोजगार, ६०-इतर कार्यक्रम, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०५) प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) (केंद्र हिस्सा) (२५०५ २९९२), ३३-अर्थसहाय्य या लेखाशीर्षाखाली रू.४२६५९.७६ लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

२. केंद्र शासनाने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेंतर्गत दुसरा हप्ता रु.४४२४.८९६ लाख इतका निधी वितरीत केला आहे. त्यानुषंगाने ग्राम विकास विभागाच्या उपरोक्त वाचा क्र.५ येथील नस्तीमध्ये प्रस्तावित केल्यानुसार सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) (पुर्वीची इंदिरा आवास योजना ) या योजनेकरीता मागणी क्र.टी-५, २५०५-ग्रामीण रोजगार, ६०-इतर कार्यक्रम, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०५)-प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) (केंद्र हिस्सा) (२५०५ २९९२), ३३-अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित रू. ४२६५९.७६ लाख इतक्या निधीतून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता प्राप्त झालेला रू. ४४२४.८९६ लाख (अक्षरी रूपये चव्वेचाळीस कोटी चोवीस लाख एकोण नव्वद हजार सहाशे फक्त) इतका निधी प्रशासकीय विभाग/ नियंत्रक अधिकारी म्हणून सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास व खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

३. प्रकरणी नियंत्रक अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय /उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

४. नियंत्रक अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची

दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

५. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ व क्र. २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच अनौपचारिक संदर्भ क्र. २१/अर्थोपाय, दि. १५-०१-२०१८ अन्वये दिलेल्या मंजूरीस अधिन राहून निर्गमित करण्यात येत असून वरील शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत असल्याची ग्राम विकास व जलसंधारण विभागाने खात्री करावी.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२२१५४५४३००२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.01.22 15:55:42 +05'30'

**रविंद्र दि. औटे**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / ठाणे / अमरावती.
४. विभागीय आयुक्त, मुंबई/ नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/अमरावती/ पुणे.
५. वित्त विभाग ( अर्थसंकल्प- १९ ), मंत्रालय, मुंबई.
६. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा मजला, विधानभवन, मुंबई.
७. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
८. कार्यासन-१७, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
९. निवड नस्ती (का.६).